**“महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती” योजनेंतर्गत परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा दुसरा टप्पा .**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्र.सारथी-२०२४/प्र.क्र.७२/का.१४२५-अ**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०१ जुलै, २०२४.

वाचा :-

१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.सारथी-२०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि.२०.०७.२०२३.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.सारथी-२०२३/प्र.क्र.३५/का.१४२५-अ, दिनांक ०६.११.२०२३
३) व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे, यांचे पत्र क्र.: सारथी/परदेश शिष्य./६७१/२०२३, दिनांक १२.०३.२०२४.

प्रस्तावना :-

“महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती” योजना २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत शासन निर्णय, नियोजन विभाग, दि.२०.०७.२०२३ अन्वये प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका आणि पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी अनुक्रमे ५० व २५ याप्रमाणे एकूण ७५ लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. पहिल्या टप्प्यात शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.सारथी-२०२३/प्र.क्र.३५/का.१४२५-अ, दिनांक ०६.११.२०२३ मधील २१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. सदर योजनेची कार्यपध्दती व निवड प्रक्रीया ही प्रस्तुत शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ (२ रा टप्पा) करीता सारथी संस्थेमार्फत वर्तमानपत्रात जाहिरातीव्दारे प्रसिध्दी देवून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सारथी संस्थेकडे विहित कालमर्यादेपर्यंत ऑनलाईन पोर्टलवर प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन छाननी समितीने पात्रतेच्या अटी/शर्ती तपासून विद्यार्थ्यांची यादी समितीच्या शिफारशीसह निवड समितीपुढे निर्णयार्थ सादर केली. अपर मुख्य सचिव, (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीची दि १८.०६.२०२४ रोजी बैठक झाली. छाननी समितीने ३० विद्यार्थ्यांची शिफारस केली होती. निवड समितीच्या बैठकीत त्यामधील एका विद्यार्थ्यास यापूर्वीच उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ (टप्पा २ रा) करीता पात्र ठरलेल्या उर्वरित २९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत पी.एच.डी. अभ्यासक्रमाकरीता (२५) पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रमाकरीता (५०) अशा एकूण ७५ जागा उपलब्ध आहेत. त्यानुषंगाने प्राप्त अर्ज विचारात घेवून खालील सन २०२३-२४ (टप्पा २ रा) या वर्षाकरीता २९ विद्यार्थ्यांच्या निवड यादीस मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पदव्युत्तर पदवी/पदविका/ पी.एचडीPG/ PG (Diploma) /Ph.D. | विद्याशाखा | अभ्यासक्रमाचे नाव | गुणांकन |
|---|---|---|---|---|---|
| | | Engineering | | | |
| 1. | Shantanu Suryakant Vichare | PG | Engineering | M.S. Electrical and Computer Engineering | 90 |
| 2. | Ritik Shashikant Shinde | PG | Engineering | Master in Professional Engineering Civil | 80 |
| 3. | Aditya Sunil Wake | PG | Engineering | M.S. in Industrial Engineering | 80 |
| 4. | Ratnesh Ravikiran Yadav | PG | Engineering | Master of Science | 75 |
| 5. | Aditya Ajit Salunkhe | PG | Engineering | Master of Civil Engineering | 75 |
| 6. | Vishal Gorakhnath Shelke | PG | Engineering | Information of Technology | 65 |
| 7. | Tushar Ramrao Deshmukh | PG | Engineering | Master of Information Technology | 50 |
| 8. | Sagar Chotusing Garad | PG | Engineering | Master of Engineering (Chemical) | 45 |
| 9. | Akshay Dhananjay Gawali | PG | Engineering | Master in Electrical and Computer Engineering | 35 |

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पदव्युत्तर पदवी/पदविका/ पी.एचडीPG/ PG (Diploma) /Ph.D. | विद्याशाखा | अभ्यासक्रमाचे नाव | गुणांकन |
|---|---|---|---|---|---|
| | | | Architecture | | |
| 1. | Dhananjay Karvir Thakare | PG | Architecture | Master of Public Policy | 55 |
| 2. | Ramani Nitin Dhere | PG | Architecture | Master of Science, Architecture (Building) | 45 |

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पदव्युत्तर पदवी/पदविका / पी.एचडीPG/ PG (Diploma) /Ph.D. | विद्याशाखा | अभ्यासक्रमाचे नाव | गुणांकन |
|---|---|---|---|---|---|
| | | | Management | | |
| 1. | Purva Janardan Deshmukh | PG | Management | Master in Business Administration | 60 |
| 2. | Megha Jitendra Shelke | PG | Management | M.Sc. International Business | 60 |
| 3. | Vidisha Vikram Lokhande | PG | Management | M.Sc. Management | 55 |
| 4. | Abhishek Pradiprao Tawade | PG | Management | Master of Engineering Management | 45 |
| 5. | Tejaswini Pushkaraj Rane | PG | Management | MBA | 45 |
| 6. | Jaysing Nandkishor Jagtap | PG | Management | Master of Business Administration and Management | 45 |
| 7. | Parth Mahesh Wable | PG | Management | International Business Management | 35 |

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पदव्युत्तर पदवी/पदविका/ पी.एचडीPG/ PG (Diploma) /Ph.D. | विद्याशाखा | अभ्यासक्रमाचे नाव | गुणांकन |
|---|---|---|---|---|---|
| **Science** | | | | | |
| 1. | Punam Subhash Jadhav | Ph.D. | Science | Doctor of Philosophy in Medical Science | 80 |
| 2. | Sarthak Madhukar Tupe | PG | Science | M.Sc. Mathematical finance | 80 |
| 3. | Pandit Lelechand Mete | PG | Science | M.Sc. (International Business) | 70 |
| 4. | Dhananjay Vijay Kapase | PG | Science | Master Astro and Particle Physics | 70 |
| 5. | Nilima Shivaji Pulate | PG | Science | Environmental Futures Sustainable Systems | 65 |
| 6. | Nishit Govind Jadhav | PG | Science | MS In Pharmaceutical and Biomedical Science | 55 |
| 7. | Omkar Vijaykumar Yamagekar | PG | Science | Master of Global Food and Nutrition Science | 55 |
| 8. | Abhijeet Ashok Dange | PG | Science | Master of food Science and Technology | 35 |
| 9. | Omkar Balasaheb Dethe | PG | Science | Master of Business Information System | 25 |

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | पदव्युत्तर पदवी/पदविका/ पी.एचडीPG/ PG (Diploma) /Ph.D. | विद्याशाखा | अभ्यासक्रमाचे नाव | गुणांकन |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Ashlesha Milind Patil | PG | Arts | Design Innovation and Interaction Design | 65 |
| 2. | Sonali Purushottam Kale | PG | Arts | Master in Transcultural Studies | 65 |

२. वरील नमूद केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना खालील अटींच्या अधीन राहून शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे.:-

I. सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या निकषांचे पालन करण्यात यावे.

II. ही शिष्यवृत्ती गृह चौकशीच्या अधीन राहू**न** मंजूर करण्यात आली असून गृह चौकशीमध्ये विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा अर्ज दाखल करताना चूकीची माहिती सादर केली असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

III. कोणत्याही विद्यार्थ्याने खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कर्तव्यात कसूर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarred) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची १५ टक्के चक्रवाढ व्याजाने वसूली करण्यात येईल, अशा विद्यार्थ्याचा काळ्या यादीत समावेश केला जाईल. तसेच, प्रचलित कायद्यानुसार त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले जामिनदार आणि संदर्भ अधिकारी / व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

IV. ही शिष्यवृत्ती मंजूर केलेल्या विद्यार्थ्याने नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. सारथी-२०२३/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि.२०.०७.२०२३ या शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याबाबतचे बंधपत्र / हमीपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

३. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शिष्यवृत्तीच्या रकमेची अचूक परिगणना करण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे, यांची असेल. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांनी नियोजन विभाग शासन निर्णय क्र.सारथी-२०२३/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि.२०.०७.२०२३ या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन शिष्यवृत्तीच्या रकमेची परिगणना करावयाची आहे. शासन निर्णयात नमूद कोणत्याही अटी/ शर्तीची पूर्तता होत नसल्यास ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येऊ नये.

४. सदरचा खर्च हा खालील नमूद लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या-त्या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक- ओ-२
२२२५ अनुसूचित जाती- अनुसूचित जमाती, इतर मागस वर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण
०३ मागासवर्गीयांचे कल्याण
१०२ आर्थिक विकास
०१ मराठा, कुणबी, कुणबी- मराठा, मराठा-कुणबी यांचे कल्याण
(०१) (०१) छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था, (सारथी)
(कार्यक्रम)
(दत्तमत) (२२२५ F ५२१)
३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)

५. वरील खर्चासाठी व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी असलेले लेखाधिकारी यांनी सदर रक्कम आहरित करुन अदा करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०७०१११५८२५७६१६ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY JAGANNATH SAVANE
Date: 2024.07.01 12:11:37 +05'30'

**(सं.ज.सवने)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री, (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
५. मा.उपमुख्यमंत्री, (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
११. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास/ आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे.
१४. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१८. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
२०. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
२१. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२२. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२३. महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२४. महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
२६. उप सचिव (१४२५-अ), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. अवर सचिव (१४२५-अ), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. अपर मुख्य सचिव, नियोजन यांचे स्वीय सहायक
२९. निवडनस्ती/१४२५-अ.